# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ८९ ) वर्धा, सोमवार ता. २९ जून १९६४ ( मूल्य ५ न.पै.


"एक सर्वांगीण क्रान्ति हवी आहे ही गोष्ट स्पष्ट आहे जागतिक संकटाची ती एक मागणी आहे. आपलें जीवन, दैनंदिन घडामोडी, आपलें व्यवसाय, आपली संकटें आणि वेदना, आपलें अगणित प्रश्न, आक्रोशपूर्वक ही मागणी करीत आहेत. आपल्याला मूलभूत स्वरूपाची, तेजस्वी क्रांतीची गरज आहे."

जे. कृष्णमूर्ति

## ग्रामदान कार्यकर्त्यांची सर्वात मोठी पूंजी सद्‌भावना

प्रो. राममूर्ति

### ह्या कायापालट का होत आहे

मुंगेर जिल्हयात (बिहार) नव्या आणि जुन्या ग्रामदानांची संख्या ३६ आहे. आणि ५८ अेप्रिल पर्यंतच्या गेल्या पावणे तीन महिन्यात झालेल्या ग्रामदानांची संख्या २६ आहे. सन १९५७ सालापासून मी भूदान, ग्रामदानाच्या भूमिकेतून सर्वोदयाचे कार्य करीत आहे. परंतु लोकमानसात ह्या विचारांचा ज्या प्रमाणात आज प्रवेश होतांना दिसूत आहे. त्याप्रमाणात ह्या विचाराचा प्रवेश पूर्वी लोकमानसात खूप प्रयत्न करूनहि होतांना दिसत नव्हता. तेच कार्यकर्ते, विचारहि तोच, कार्यपद्धतिहि जुनीच आणि लोकहि तेच परंतु परिणाम मात्र नवीन होतांना दिसत आहेत. कधी कधी मी त्यामुळे स्तंभित होतो आणि माझे मन कारण परंपरा शोधू लागते वातावरणात असा कोणता नवीन बदल झाला आहे की लोक ह्या विचाराकडे अधिक लक्ष देऊ लागले आहेत ?

काय युग विकास-क्रमाच्या प्रक्रियेमुळे लोक शेजाऱ्याबाबत अधिक सवेदनाक्षम झाले आहेत ? काय ह्यापुढे व्यक्तिगत जीवनातून प्रगट होणारा संकुचित पुरुषार्थ जीवन संघर्षात विजय मिळवून देण्यास असमर्थ ठरतांना पाहून आजचा गृहस्थ समाजाच्या भाग्यासोबत आपले भाग्य जोडण्यास तयार होत आहे ? काय विज्ञानाच्या तीव्र गतीमुळे आपल्या प्रश्नांचीहि तीव्रतेने त्याला जाणीव होऊ लागली आहे आणि ते सोडविण्यासाठी तो अधीर झाला आहे ? काय लोक आज प्रचलित राजनीति आणि सरकारी योजनांना कंटाळली आहे आणि सर्वोदयाचा पक्षमुक्त, जातिमुक्त, वर्गमुक्त, मानवनिष्ठ विचार ज्यामुळे सर्व जगाचे हित साधण्याची शक्यता वाटत असल्यामुळे लोक हा विचार ग्रहण करण्यास उत्सुक दिसत आहेत?

काय आजच्या ग्रामदानानंतर निर्माण होणाऱ्या नवीन समाज व्यवस्थेमुळे लोकांच्या चिंता व प्रश्न मिटतील अशी शक्यता त्यांना वाटत आहे; आणि त्यामुळे ग्रामभावना व ग्रामशक्तीची कल्पना त्यांच्या हृदयाला स्पर्श करीत आहे; आणि त्यामुळे लोकात नवीन आशेचा संचार होत आहे ?

काहीहि असो, हा विषय मनोविज्ञान वेत्ते व समाजशास्त्रांनी संशोधन करण्यासारखा आहे की कोणत्या विचारामुळे, कोणत्या परिस्थितीमुळे प्रभावित होऊन, आणि कोणत्या ज्ञात अज्ञात प्रेरणांमुळे प्रेरित होऊन गावगाले ग्रामदानाचा स्वीकार करीत आहेत कारणे कोणतीहि कां असेनात हे स्पष्ट आहे की पूर्वीचे ग्रामदान हे कोरे ग्रामदान होते विसावा हिस्सा भूमीचे दान, ग्रामसभा आणि ग्रामनिधि ह्या तीन गोष्टी सामील वरून नवे ग्रामदान खादी आणि शांतीसेना ह्यांच्या सहाय्याने गावाची अेक संपूर्ण व्यवस्था योजनेच्या रुपाने प्रगट झाली आहे.

लोकांना दिसते आहे की ग्रामदानाच्या शर्ति त्यांच्या शक्तीच्या आटोक्या बाहेरच्या नाहीत; आणि ग्रामदानात त्याला जितके द्यावे लागते त्यापेक्षा अधिक त्याला मिळण्याची शक्यता त्यात आहे, आणि ही अशी एक योजना आहे की ज्या योजनेमुळे त्याच्या व्यक्तिगत हितात आणि गावाच्या सामूहिक हितात विरोध येत नाही मालक, महाजन आणि सरकारी तंत्र ह्यांच्या द्वारा चालणारे दमन व शोषण ह्यामुळे तो जितका त्रस्त झाला आहे तितकाच ह्या योजनेत त्याला सुरक्षितता वाटत आहे.

### प्रभू मूरति देखी तिन तैसी

आम्ही अनेक ग्रामदानी गावाच्या लोकांना विचारले की तुम्ही ग्रामदान कां केले ? उत्तर मिळाले 'आमच्या जमीनी विक्रीपासून सुरक्षित राहतील, आमचे शेत सावकाराच्या हातातून सुटेल, आम्ही कर्जाच्या भाराने दबून गेलो आहोत त्यातून आमची सुटका होईल; काही मार्ग त्यामधून निघेल, मुकद्दमेबाजीने आम्ही हैराण झालो आहोत, स्वतः गहाण पडण्याची पाळी आली आहे. ती मुकद्दमेबाजी बद होईल. ग्रामदान झाले तर तुम्ही लोकहि याल, आणि काही आमच्यासाठी कराल."

मजूर म्हणाले "आम्हाला काही जमीन मिळेल, आणि गाव अेक झाले तर आम्हालाहि इज्जतीने भाकर खायला मिळेल." आणि कित्येक मालकांनी "गावातील वैमनस्यापासून बचाव होईल" असे सांगतले गावातील मध्यम वर्गीय लोक आर्थिक दृष्टया जर्जर झाले आहेत व आतल्याआत कुढत आहेत. त्यांना वाटते की सर्वोदयातून त्यांना काही रस्ता सापडेल.

### आदिवासी क्षेत्रातील अनुभव आमचे सर्वात मोठे भांडवल सद्‌भावना

आदिवासी गावांचा अनुभव ह्यहून भिन्न आहे. आदिवासी 'दिक्कू' ( दुसरे ) वर विश्वास ठेवित नाहीत. त्यांच्यात काम करायचे झाल्यास त्याचेच जातभाई लागतात मुंगेर जिल्ह्यातील चकाई, व झाझा विकास खंडात जी काही ग्रामदाने झाली आहेत ते सव आमच्या तरुण आदिवासी कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाने किंवा त्यांच्या मित्रांच्या सहकार्याने झालेली आहेत. आणि त्यांचे नायक आणि शिक्षक ह्यांचा ह्या कामात प्रमुख हिस्सा आहे. आदिवासींना कायद्याने आपली जमीन विकण्याचा अधिकार नाही; परंतु त्यांची बहुतेक जमीन कर्जापायी सावकाराच्या हातात गेलेली आहे. कर्ज काही फिटत नाही आणि जमीन काही वापस मिळत नाही. ग्रामदानामुळे ह्या शेतकऱ्यांचा अंत होईल असे त्यांना वाटते. परंतु ह्या गावांचे ग्रामदान होण्यासाठी अेकच कारण प्रमुख आहे की ह्या भागातील लोकांची कित्येक वर्षापासून सेवा केल्यामुळे सद्‌भावनेचे भांडवल गोळा झाले आहे. आणि त्यामुळेच त्या भांडवलाच्या आधारावर सधन टापू ग्रामदानात सामील झाला आहे. सेवा दोन प्रकारची झाली आहे. १) संक्रमक रोगांच्या वेळी आपले जीवीत धोक्यात टाकून लोकांची केलेली सेवा शुश्रुषा आणि २) त्यांच्यातील झगडे सद्‌भावना पूर्वक मिटविण्याचा कार्यकर्त्यांनी केलेला प्रयत्न. त्यामुळे लोकमानसावर प्रभाव पडतो.

आणि त्यांच्यातूनच काही चैतन्यशाली लोक सक्रिय होतात आणि त्यांचा सहकार मिळू लागतो. आमच्या कामात शिक्षकांची फार मदत झाली. काही जनसेवक व पाटील ह्यांनीहि उत्साहाने मदत केली आहे. त्यांचा सहयोग मिळाला नसता तर लोकांच्या हृदयात शिरणे कठीण झाले असते. ज्या गावात सक्रिय सहकारी मिळाले तीच गावे ग्रामदानात आली आणि शिक्षक लोकांची संख्या त्यात मोठी आहे.

### ह्या कायापालटाला बाधक लोक

१) जे नोकरीपेशाद्वारा कलकत्ता, मुंबई, पाटना येथे पैसा कमवून जमीन विकत घेतात आणि बडे बनण्याची महत्वाकांक्षा बाळगतात.

२) ज्यांनी ब्लॉकच्या ऑफिसात चकरा मारून, पक्षात शिरकाव करून, गावाचे प्रमुख बनून सत्तेची उपासना चालविली आहे आणि भविष्यात एम्. एल. ए. किंवा एम. पी. बनण्याचे स्वप्न पाहत आहेत.

३) पैसा किंवा धान्य देऊन सावकारी करणारे, ठेके घेणारे

